जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

16 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १५ हजार किलोमीटर, ६५ दिवस प्रवास अन् २० देशांत मुक्काम

## उद्योगांच्या अभ्यासासाठी कोल्हापूरचे तिघे व्यावसायिक चारचाकीने लंडनला रवाना

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : परदेशी लोक भारतात येतात आणि येथील संकल्पना घेऊन आपला उद्योग विस्तार करतात. त्याप्रमाणे परदेशातील व्यवसायांची माहिती घेऊन कोल्हापूरच्या व्यावसायिकांनी अद्ययावत झाले पाहिजे. या उद्देशाने कोल्हापूरचे व्यावसायिक प्रताप कोंडेकर, मदन भंडारी, हेमंत शहा असे तिघेजण आज, सोमवारी लंडनला रवाना झाले. दोन चारचाकींद्वारे तिघेजण १५ हजार किलोमीटरचा प्रवास ६५ दिवसांत २० देशांमधून करणार आहेत.

पर्यटनाच्या निमित्ताने परदेशी पर्यटक भारतात येतात. येथील संस्कृती, खानपान, उद्योगांची माहिती घेतात. मग आपल्या देशात गेल्यानंतर येथील संकल्पना, अभ्यास करून उद्योगांचा विस्तार करतात. अशाच पद्धतीने आपणही या देशांमध्ये जाऊन तेथील संस्कृती, उद्योग व्यवसायांची माहिती घेऊन आपलेही उद्योग कशाच्या पातळीवर उभे राहावेत. या उद्देशाने कोंडेकर, भंडारी, शहा या तिघा मित्रांनी लंडनपर्यंत रस्ते मार्गावरून चारचाकीने जाण्याचा निर्णय घेतला. या दरम्यान त्यांना 'रोड लंडन' या साहसी मोहिमेची माहिती मिळाली. यात त्यांनी सहभाग नोंदवला. यात देशभरातील अन्य लोकही सामील होतात. त्याप्रमाणे या तिघांनीही सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सहा महिन्यांपासून व्हिसा, आंतरराष्ट्रीय वाहन चालविण्याचा परवाना आदी कागदपत्रांची पूर्तताही केली. ठरल्याप्रमाणे आज तिघांनी शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून मोहीम सुरू केली. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

> “ परदेशी लोक येथे पर्यटनानिमित्त येतात आणि येथील इन्फ्रास्ट्रक्चर, संस्कृती, व्यवसायांची माहिती घेतात. त्याचा प्रयोग आपल्या देशात जाऊन आपले उद्योगांचा विस्तार करतात. म्हणून आपणही तेथील पायाभूत सुविधा, पाणी, उद्योगांचा अभ्यास करणार आहोत. त्याचा आपल्या व्यवसायात उपयोग होईल. चारचाकीतून रस्ते मार्गाने जाणे आव्हानात्मक आहे. हा आनंदही आम्ही घेऊ.
>
> **- हेमंत शहा**, व्यावसायिक

> “ समृद्ध कोल्हापुरात पाणी वाचविण्याविषयी प्रबोधन होणे गरजेचे आहे. मोहिमेदरम्यान तेथील देश पाणी कसे वाचवतात. याचा अभ्यास करून तसे प्रयोग कोल्हापुरातही करण्यासाठी या साहसी मोहिमेत सहभागी झालो आहे.
>
> **- प्रताप कोंडेकर**, व्यावसायिक

### परदेशांतील पाणी बचतीचे प्रयोग पाहणार

■ मुळात ही मोहीम शुक्रवारी (दि. ११) पासून गोरखपूर येथून सुरू होणार आहे. दरम्यान, प्रवास मार्गात येणाऱ्या देशांमध्ये पाणी कसे वाचविले जाते, याचाही अभ्यास ही मंडळी करणार आहेत. त्याचा उपयोग कोल्हापुरात परतल्यानंतर स्थानिक पातळीवर करणार आहोत.

### प्रवास असा....

■ गोरखपूर- लुम्बिनी-पोखरा (भारत)- काठमांडू (नेपाळ)- तिमुरे-गौरंग-तिंगरी-शिगात्से- ल्हासा-दमक्संहग- अमदो- गोलमुडे-दनहंग-तुर्पण-कुईतले- अकेसु (चीन) - ओश (कार्यगिस्तान) - फेरगना- ताश्कंद-समरकंड-बुखारा-खिवा- नुकुस (उझबेकिस्तान), बेन्यु-अतर्यु )उझबेकिस्तान)-अस्तनखान- बुधेनुओस्कू-नालचिक-वेरकलस्य पिगडॉन (रशिया) - तिबिलिसा- बातुमी (जॉर्जिया) - तरबजान- कॅपोचिया- इस्तंबुल (तुर्की) - सोफिया (बल्गेरिया)- बुडापेस्ट (हंगेरी) - प्रेग (झेक)-ब्रुसेल्स(बेल्जियम) - लंडन (युरोप) आदी २० देश.



कोल्हापूर : चारचाकीने कोल्हापूर ते लंडनला निघालेल्या प्रताप कोंडेकर, मदन भंडारी, हेमंत शहा यांना शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2024
पुढारी

# जलप्रबोधनाचा संदेश देत कोल्हापूरचे उद्योजक लंडनला रवाना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

निसर्ग संवर्धन आणि जलसाक्षरता प्रबोधनाच्या हेतूने व्यापक प्रबोधन करण्यासाठी कोल्हापूरचे आठ उद्योजक दोन मोटारींतून ६० दिवसांच्या प्रवासाला सोमवारी रवाना झाले.

प्रताप बापू कोंडेकर आणि हेमंत शहा यांच्या नेतृत्वाखाली हे निसर्गप्रेमी उद्योजक रवाना झाले आहेत. सकाळी शिवाजी विद्यापीठ प्रांगणात शिवाजी विद्यापीठाचे ए. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे यांच्यासह डॉ. संदीप पाटील, मराठा महासंघाचे शशिकांत पाटील, उदय पाटील, डॉ. हरीश नांगरे यांच्यासह राजीव लिंग्रज आणि विविध मान्यवरांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. दि. २२ जूनपर्यंत १३ देशांतून त्यांचा प्रवास होणार आहे. भारतातून नेपाळमार्गे चीन, रशिया, कजाकिस्तान, गॉर्जिया, उज्बेकीस्तान, सार्बिया, बेल्जियमसह ते लंडनमध्ये प्रवास करणार आहेत. या सर्व ठिकाणी विविध मान्यवरांना भेटत तसेच राजकीय प्रमुखांना भेटत ते जलसाक्षरता आणि निसर्ग संवर्धन यासाठी संवाद साधणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2024
तरुण भारत

# तंत्रज्ञान अधिविभागात स्टुडन्टस् चाप्टरला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग रेफ्रिजरेटिंग अँड एयर कंडिशनिंग इंजिनिअर्स कोल्हापूर स्टुडंट्स चाप्टर प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे उदघाटन दिल्ली येथील संघटनेचे अध्यक्ष अनुप बलानी यांच्या हस्ते झाले. अनुप बलानीजी यांनी विद्यार्थांशी संवाद साधला व हीटिंग आणि रेफ्रिजरेशन विषया संदर्भात मार्गदर्शन केले. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, घरातील हवा गुणवत्ता सुधारण्यासाठी, ऊर्जा संवर्धनासाठी मदत करण्यासाठी, आणि सतत शिक्षण देण्यासाठी, स्थानिक महाविद्यालये व संस्थांमधील विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले. या चाप्टर मार्फत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या संधींची माहिती दिली. स्टुडंट्स चाप्टरचे तंत्रज्ञान अधिविभागातील शिक्षक सल्लागार म्हणून विभागप्रमुख डॉ. एस. एन. सपली आणि शिक्षक समन्वयक म्हणून सहाय्यक प्रा. सागर पोर्लेकर यांनी काम पाहिले. मनीष गुलालकरी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा शपथ विधी पार पडला. विद्यार्थी अध्यक्ष निशांत सूर्यवंशी, उपाध्यक्षा गायत्री गोखले, खजिनदार म्हणून ऋषिकेश पदमन, सचिव म्हणून साई तांदळकरी व इतर कमिटीमध्ये काम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. श्रावकी संघटनेचे कोल्हापूर अध्यक्ष प्रमोद पुणगांवकर, माजी अध्यक्ष सुरेश पाटील डॉ. अजित कोळेकर, डॉ. प्रविणकुमार पाटील आदी उपस्थित होते.

■ -इंडियन सोसायटी ऑफ हिटींग रेफ्रिजरेटिंग अँड एयर कंडिशनिंग इंजिनिअर्सचा उपक्रम